नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि.२४/०८/२०२६

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
तहकूब सभा परिपत्रक

महिला व बालकल्याण समितीची सभा (बुधवार दि.१९/०८/२०२६ रोजी तहकूब केलेली) सोमवार, दि.३१/०८/२०२६ रोजी दुपारी ४:०० (चार वाजता) वाजता समिती सभागृह नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्र.०८, दि. १९/०८/२०२६ वरील विषय क्र. ११४ ते विषय क्र. १२१ चा विचार होईल.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्र. ०९

महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा सोमवार,दि.३१/०८/२०२६ रोजी दुपारी ४:०५ (चार वाजून पाच मिनिटे) वाजता समिती सभागृह नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १२२

मा. सौ.अल्पना गणेश वरपे व मा.सौ.रुपाली सचिन पवार यांचे दि.१८/०८ /२०२६ रोजीचे पत्र.

श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था गेली १६ बर्षे शैक्षणिक संस्था म्हणून पुणे भागात कार्यरत आहे, तसेच ही संस्था सामाजिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात काम करत आहे. पण सध्याचे परिस्थिती पाहता मुले आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहत आहे. आणि या घटकांचा विचार करुन ही संस्था या मुलांकरता रात्र शाळा/कॉलेजसाठी आपणाकडे बावधन भागातील स्वामी विवेकानंद ई लर्निंग स्कूल बावधन ही पुणे महानगरपालिकेची शाळा आपणाकडे ६ वर्ग खोल्या ८५ विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षे भाडेतत्वावर मिळण्याकरिता विनंतीपूर्वक मागणी करत आहे. सदर शाळा ही दिवसभर महापालिकेची शाळा भरेल त्याच्या नंतर सायंकाळी ४ तासांसाठी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशनला भाडेतत्वावर मिळण्यासाठी आपणाकडे विनंती अर्ज करीत आहे. महापालिका जे काही मानधन ठरवेल ते देण्यास आम्ही तयार आहोत.

तरी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेला स्वामी विवेकानंद ई लर्निंग स्कूल बावधन ही शाळा रात्र शाळा व कॉलेजसाठी भाडे तत्वावर चालवण्यासाठी मान्यता मिळावी.

<u>विषय क्र. १२३</u>

मा. अतुल नारायण तरवडे यांचे दि.२१/८/२०२६ चे पत्र.

१८ वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांवर आवश्यक असलेल्या मोठ्या शस्त्रक्रिया राज्य शासनामार्फत पूर्णपणे मोफत करण्यात याव्यात. तसेच यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून शासकीय व मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

<u>मा.महा.आयुक्त यांच्या कडून आलेले पत्र</u>

<u>विषय क्र. १२४</u>

प्रभाग क्र.१६ मधील हडपसर गोंधळेनगर येथील कै. रामचंद्र आप्पा बनकर इंग्रजी माध्यमिक विदयालय येथे इयत्ता अकरावी आणि बारावी विज्ञान, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत मा. सौ.वैशाली बनकर व मा.सुहास विजय टिंगरे यांचे पत्रावर झालेला मा. महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.३८ दि.१८/०६/२०२६ ला अनुसरून मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माध्यमिक/४४३, दि.१३/०८/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्र. १२५</u>

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील उप आरोग्य अधिकारी, वर्ग-१ हे पद अर्हता धारण करणाऱ्या कार्यरत सहाय्यक आरोग्य अधिकारी, वर्ग-१ या संवर्गामधून तात्पुरत्या पदोन्नतीने भरणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/४७४,दि.१८/०८/२०२६ चे पत्र.

<u>विषय क्र. १२६</u>

सि.स.नं.२१४५ पै व २१४३ पै, स.नं.२०४ पै., २०५ पै., सिद्धार्थनगर येरवडा पुणे येथील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.१/४७८ दि.१९/०८/२०२६ चे पत्र.

योगिता भोसले
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका